वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा
पहिला मजला, मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे – ४११००१
दूरध्वनी क्रमांक : ०२०-२६१३००५४ ई-मेल : vslnapune22@gmail.com

क्रमांक:वपाविय/कृषी/प्र.मं.कृ.सिं.यो.२.०.तां.स.११ वी बैठक/ 30८/२०२५ दि. ३१/०३/२०२५.

प्रति,

१. मा आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय महाराष्ट्र राज्य, पुणे
२. मा. आयुक्त, मनरेगा, नागपूर
३. मा. अपर आयुक्त, जलसंधारण तथा मुख्य अभियंता (मृद व जलसंधारण पुणे)
४. मा. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
५. मा. संचालक, सुदूर संवेदन उपाय योजना केंद्र, पुणे
६. मा. मुख्य वन संरक्षण, वने, पुणे
७. मा. सह सचिव, मृद व जलसंधारण मंत्रालय, मुंबई
८. मा. अवर सचिव, मृद व जलसंधारण मंत्रालय, मुंबई
९. मा. अध्यक्ष, जानपीर ग्रामविकास संस्था, शिरपूर, ता आष्टी, जि. बीड
१०. मा. संचालक, मृद संधारण व पा.क्षे.व्य. महाराष्ट्र राज्य, पुणे

विषय - प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना- पाणलोट विकास घटक- २.०(PMKSY-WDC-२०) अंतर्गत राज्यस्तरीय तांत्रिक समिती ची ११ व्या बैठकीचे इतिवृत्त.

संदर्भ- १. महाराष्ट्र शासन निर्णय क्र. कंपुयो २०२२/प्र.क्र.१५/जल-८ दि. २७-०४-२०२२.
२. महाराष्ट्र शासन शुद्धीपत्रक क्र. केपुयो २०२२/प्र.क्र.१५/जल ८ दि. ११.०५-२०२३.

उपरोक्त संदर्भीय विषयानुसार प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास घटक- २.० (PMKSY-WDC-२.०) अंतर्गत सविस्तर प्रकल्प अहवालाच्या शिफारशीस्तव राज्यस्तरीय तांत्रिक समितीची ११ वी बैठक दिनांक ०५ मार्च, २०२५ रोजी Online पद्धतीने आयोजीत करण्यात आली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त अवलोकनार्थ तथा पुढील कार्यवाहीस्तव या पत्रासोबत सादर करण्यात येत आहे.

31.3.25
(कमलाकर रणदिवे)
अपर मुख्य कार्यकारी अधिकारी,
(प्र. कृ.सि.यो २.०)
वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा,
महाराष्ट्र राज्य, पुणे

# वसुंधरा राज्यस्तरीय पाणलोट विकास यंत्रणा, पुणे

राज्यस्तरीय तांत्रिक समिती (SLTC) ११ वी बैठक बुधवार, दि. ०५/०३/२०२५ चे इतिवृत्त.

प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना- पाणलोट विकास घटक-२.० अंतर्गत राज्यस्तरीय तांत्रिक मंजूरी समिती (SLTC) ची ११ वी बैठक बुधवार, दि. ०५/०३/२०२५ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे यांचे अध्यक्षतेखाली वसुंधरा, पुणे येथे online पद्धतीने संपन्न झाली. सदर बैठकीस उपस्थित असलेल्या समितीच्या सदस्य व अधिकाऱ्यांची यादी सोबत सहपत्रित करण्यात आलेली आहे. केंद्र शासनाकडून राज्यात सन २०२१-२२ मध्ये १४४ प्राथमिक प्रकल्प अहवाल मंजूर करण्यात आलेले आहेत. त्यापैकी १३८ प्रकल्पांच्या सविस्तर प्रकल्प अहवालांना या पुर्वीच्या बैठकांमध्ये मंजुरीची शिफारस करण्यात आलेली आहे.

प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना- पाणलोट विकास घटक-२.० अंतर्गत जिल्हा पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्र (WCDC) यांची मान्यता प्राप्त असलेले जिल्हानिहाय सविस्तर प्रकल्प अहवालांची छाननी करणे व परिपुर्ण प्रस्ताव राज्यस्तरीय तांत्रिक मंजूरी समिती (SLTC) च्या मान्यतेस सादर करण्याकरीता वाल्मी, औरंगाबाद येथील प्राध्यापक व मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन शाखा, कृषि आयुक्तालय, पुणे येथील कृषि उपसंचालक व कृषि अधिकारी यांना वसुंधरा कार्यालयाचे आदेश क्र.वपाविय/SLTC/२३/२०२४ दि.१२/०१/२०२४, परिपत्रक क्र. १९२/२०२३ दि.१२/०४/२०२३, आदेश क्र. वपाविय/कृषी/प्र.म.कृ.सि.यो.२.०/ता.स. ९वी बैठक/२०/२०२३ दि.०९/०१/२०२४, अन्वये आदेश देण्यात आलेले होते. त्यानुसार संबधित प्राध्यापक व अधिकारी यांनी जिल्हानिहाय प्राप्त २ सविस्तर प्रकल्प अहवालांची छाननी करून योग्य असलेल्या २ प्रकल्पांच्या सविस्तर प्रकल्प अहवालांचे राज्यस्तरीय तांत्रिक समिती (SLTC)च्या दि. ०५/०३/२०२५ रोजीच्या ११ व्या बैठकीमध्ये खालीलप्रमाणे शिफारशीस्तव सादरीकरण करण्यात आले. सादरीकरण करण्यात आलेल्या २ प्रकल्पांपैकी २ प्रकल्पांच्या सविस्तर प्रकल्प अहवालांना राज्यस्तरीय तांत्रिक मंजूरी समिती (SLTC)ची मंजूरीस्तव शिफारस करण्यात आली. सविस्तर प्रकल्प अहवालांना प्रकल्प व्यवस्थापक तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी यांनी सादर केलेल्या अभिलेखांच्या व माहितीच्या आधारे मान्यतेसाठी शिफारस करण्यात येत आहे. मजकुराचा सत्यतेबाबत प्रकल्प व्यवस्थापक तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी जबाबदार राहतील.

याबाबतचा सविस्तर तपशील पुढील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे आहे.

सभेचे प्रास्ताविक सदस्य सचिव तथा अपर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले. त्या वेळी त्यांनी खालीलप्रमाणे सूचना दिल्या.

१. सविस्तर प्रकल्प अहवाल हा योजनेचा अत्यंत महत्वपुर्ण घटक असून गुणवत्तापुर्वक सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केलेले असावेत.
२. सविस्तर प्रकल्प अहवालांचे सादर करताना विहीत प्रपत्रातील सर्व भाग सादर करण्यात यावेत.
३. काही प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल प्रकायं हे संस्थांमार्फत तयार करून घेत असून संस्थेचा प्रकायं सोबत समन्वय दिसून येत नाही.
४. प्रकल्पांतील निवडलेली गावे जल परिपुर्ण होण्याच्या दृष्टीने पाणलोट कामांचे नियोजन करण्यात यावे अशा सुचना अध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिल्या.
५. सदस्य सचिव यांनी सांगितल्याप्रमाणे परिपुर्ण सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करण्यात यावेत. अर्धवट तसेच त्रुटीयुक्त सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करण्यात येवू नये. त्रुटीयुक्त सविस्तर प्रकल्प अहवालांना बैठकीमध्ये शिफारस करण्यात येणार नाही.

**राज्यस्तरीय तांत्रिक समिती (SLTC) ११ वी बैठक बुधवार, दि. ०५/०३/२०२५ रोजी सादर करण्यात आलेले सविस्तर प्रकल्प अहवाल**

| अ. | जिल्हा | प्रकल्पाचे नाव | प्रकल्प क्षेत्र (हे.) | मुल्य (रू.लाख) | राज्य स्तरीय तांत्रिक समिती (SLTC) चे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| १ | भंडारा | Bhandara (WDC-2.0)/1/2021-22 | ११७१.३२ | २५७.६९ | सदर स.प्र.अ. चे सादरीकरण प्रकल्प व्यवस्थापक तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी श्री. महेश सेलूकर यांनी केले. सदर प्रकल्पातील नाला खोलीकरणाची ४७ % तरतुदी अंतर्गत प्रस्तावित करण्यात आलेली कामे अभिसरणाअंतर्गत प्रस्तावित करण्याबाबत अशा सूचना देण्यात आल्या. त्याऐवजी ४७ % तरतुदी अंतर्गत क्षेत्र उपचाराची कामे प्रस्तावित करण्याबाबत अशा सूचना देण्यात आल्या. फळबाग लागवडीसाठी MREGS चे मापदंड वापरावे. वन क्षेत्रावर तक्ता क्र. १२ ब मध्ये प्रस्तावित वन उपचार क्षेत्रानुसार NRM करिता रक्कम दर्शवावी. |

| अ. | जिल्हा | प्रकल्पाचे नाव | प्रकल्प क्षेत्र (हे.) | मुल्य (रू.लाख) | राज्य स्तरीय तांत्रिक समिती (SLTC) चे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | बैठकीमध्ये दिलेल्या त्रुटी पुर्ततेच्या अधीन राहून सदर स.प्र.अ.ला मंजूरीस्तव शिफारस करण्यात आली. |
| २ | भंडारा | Bhandara (WDC–2.0)/1/2021-22 | १२९६.०० | २८५.१२ | सदर स.प्र.अ. चे सादरीकरण प्रकल्प व्यवस्थापक तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी श्री. महेश सेलूकर यांनी केले. सदर प्रकल्पातील नाला खोलीकरणाची ४७ % तरतुदी अंतर्गत प्रस्तावित करण्यात आलेली कामे अभिसरणाअंतर्गत प्रस्तावित करण्याबाबत अशा सूचना देण्यात आल्या. त्याऐवजी ४७ % तरतुदी अंतर्गत क्षेत्र उपचाराची कामे प्रस्तावित करण्याबाबत अशा सूचना देण्यात आल्या. फळबाग लागवडीसाठी MREGS चे मापदंड वापरावे. बैठकीमध्ये दिलेल्या त्रुटी पुर्ततेच्या अधीन राहून सदर स.प्र.अ.ला मंजूरीस्तव शिफारस करण्यात आली. |

(कमलाकर रणदिवे)
अपर मुख्य कार्यकारी अधिकारी,
वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, २.०

प्रकाश खपले (भा. प्र. से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, २.०